सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 304 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /          दिनांक : 05 / 08 / 2025

# 1)घरफोडी :–

**कंधार :–** दिनांक 03.08.2025 रोजी 10.30 ते 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी मौ. पेटवडज (पुनवर्सन) ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याची पत्नी हे शेताकडे गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरात ठेवलेले सोन्या –चांदीचे दागीने व मोबाईल किंमत 55,000 / –रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अशोक माधवराव मेकवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मौ. पेटवडज (पुनवर्सन) ता. कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 267 / 2025 कलम 331(3), 305 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1265 गिते, मो.नं. 8007807771** हे करीत आहेत.

# 2)गंभीर दुखापत :–

**नायगांव :–** दिनांक 03.08.2025 रोजी 16.00 ते 17.00 वा. चे दरम्यान, **ताटे यांचे दुकाना समोर चौकात मौ. मांजरम ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे सुनिल दत्तराम तेलंगे, वय 25 वर्षे, रा. धनोरा कौठा ता. कंधार याने फिर्यादीस माझे विरूध्द पोलीस स्टेशन येथे साक्षीदार का झालास म्हणुन विचारले असता फिर्यादी आरोपीस म्हणाला की, " मी काय खोटा साक्षीदार झालो का " असे फिर्यादीने म्हणताच आरोपीने फिर्यादीचे तोंडावर मारून दात पाडुन गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी संजय बाबाराव हत्ते, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. धानोरा कौठा ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं 177 / 2025 कलम 117(2),118(1),115(2),352,351(2),(3), भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास श्री सपोउपनि / पेदे, मो.नं.** 8208999464 हे करीत आहेत.

# 3)प्राणी संरक्षण कायदा :–

**अर्धापुर :–** दिनांक 03.08.2025 रोजी 23.35 वा. चे सुमारास, **मौ. पारडी टोल नाका पुढील ब्रिजवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.नसीम इकबालखान, वय 24 वर्षे, 2.रहीश बाबु कुरेशी, वय 45 वर्षे, हरून कलवा कुरेशी, वय 47 वर्षे, 4. अझरूद्दीन पि. नसरूद्दीन खान, वय 28 वर्षे, रा. हरियाणा, उत्तर प्रदेश, हे विना परवाना बेकायदेशीररित्या म्हैस वर्गीय जातीचे 30 रेडे दाटी वाटी क्रुरतेने व निर्दयीपणे वाहनात कोंबुन किंमत 5,09,000 / –रू व एक टाटा कंपणीचा ट्रक क्रमांक आरजे–14 / जीके–8065 किंमत 30,00,000 / – रू असा एकुण 35,09,000 / –रू मुद्देमाल चोरटी विक्री करण्याकरीता वाहतुक करीत असतांना मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि / श्री परमेश्वर भाऊराव सुर्यवंशी, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 450 / 2025 कलम 11(1),(ड),(ई) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सह कलम 6 महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1074 नरवाडे,** मो.क्रं. 9823044724 हे करीत आहेत.

# 4)शासकीय कामात अडथळा :–

**माहुर :–**दिनांक 04.08.2025 रोजी 06.00 वा. चे सुमारास, **मौ. केरोळी फाटा ता. माहुर जि. नांदेड येथे,**यातील फिर्यादी हा त्याचे ताब्यातील शासकीय वाहन शासकीय कामासाठी घेऊन जात असतांना, यातील आरोपी नामे 1.प्रफुल नारायण राठोड, 2. विवेक गणेश राठोड इतर एक नाव माहीत नाही, तिघे रा. शेकापुर ता. माहुर यांनी आपले वाहन रॉंग साईडला लावले असल्याने बाजुस घेण्यास सांगीतले असता आरोपीतांनी संगणमत करून शिवीगाळ व थापड बुक्याने मारहाण केली व त्यातील एकाने हातातील कडयाने नाकावर, तोंडावर व पाठीत मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रणजीत श्रीराम इंगोले, वय 43 वर्षे, व्यवसाय नौकरी बस चालक माहुर आगार ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 138 / 2025 कलम 132, 121(1),118(1),115(2), 352, 351(1),(2),3(5), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री ब्राम्हण , मो.क्रं. 9921235344** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)वजिराबाद :–** **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.** त्या अनुषंगाने दिनांक 04.08.2025 रोजी 11.45 वा. चे सुमारास, **गोवर्धनघाट नदीघाट भागात नांदेड येथे,** यातील आरोपी नामे मनोज किशनसिंग बोथ, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गोवर्धनघाट दिलीपसिंघ कॉलनी नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या एक लोखंडी खंजर किंमत 300/–रू चा ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2543 हबीब जाबर चाऊस, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 337/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1774 एमेकर, मो.क्रं. 8482883304** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 04.08.2025 रोजी 21.50 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी मौ. सिरजखोड ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे हाजीखॉ अय्युबखा पठाण, वय 21 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सिरजखोड ता. धर्माबाद नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या एक लोखंडी तलवार व खंजर किंमत 1900/–रू चा ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री बसवंत बागन्ना मुत्येपोड ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 246/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1135 संगेवार, मो.क्रं. 9021961607** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**अर्धापुर :–** दिनांक 03.08.2025 रोजी 19.10 वा. चे सुमारास, **मौ. चाभरा तांडा गावातील श्रीराम गल्लू राठोड यांचे घरासमोर, ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. राजेश रामराव आडे, वय 35 वर्षे व इतर 15 आरोपी ता. अर्धापुर हे विना परवाना बेकायदेशिररित्या लाईटच्या उजेडात गोल रिंगण करून हार जित व अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना साहित्य व नगदी 7980/–रु, चा. मुद्देमालासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/67 ज्ञानेश्वर भगवानराव भिसे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 449/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1074 नरवाडे, मो.क्रं. 9823044724** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबिशन :–

**1)किनवट :–** दिनांक 03.08.2025 रोजी 19.10 वा. सुमारास, **मौ. धानोरा तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे किशोर उर्फ बाळु नागोराव राठोड, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धानोरा तांडा ता. किनवट जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारू काढण्याचे रसायण किंमत 3000/–रू मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2589 ओंकार सुरेश पुरी, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 248/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2547 श्री वाघमारे,** मो.नं. 8669005593 हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 03.08.2025 रोजी 20.30 वा. सुमारास, **मौ. धानोरा बेल्लोरी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शामराव सदाशिव हुस्दुके, वय 42 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धानोरा बेल्लोरी ता. किनवट जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारू काढण्याचे रसायण किंमत 10,000/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोनि/देविदास जम्मनाथ चोपडे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 249/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2547 श्री वाघमारे,** मो.नं. 8669005593 हे करीत आहेत.

**3)किनवट :–** दिनांक 03.08.2025 रोजी 21.00 वा. सुमारास, **मौ. धानोरा तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे अनिता विनोद तिडके, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धानोरा बेल्लोरी ता. किनवट जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारू किंमत 2,000/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2547 सिध्दार्थ किशनराव वाघमारे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 250/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2547 श्री वाघमारे,** मो.नं. 8669005593 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड